


दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ । अंक ३६ । बुधवार २८ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# पाथर्डीत चोरट्यांचा धुमाकूळ घालत सशस्त्र दरोडा

## बंद घरांना केले लक्ष्य ; सोने व रोख रक्कम लंपास

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पाथर्डी–** शहरातील बंद घरांना लक्ष्य करून चोरट्यांनी घरफोडी केल्याच्या दोन घटनांमुळे पाथर्डी शहरात खळबळ उडाली आहे. शहरातील फुलेनगर परिसरातील संतोष भगवान खेडकर आणि भगवाननगर परिसरातील रशीद शेख यांच्या राहत्या घरांचे दरवाजे तोडून चोरट्यांनी रोख स्वरूपात दहा लाख रुपये व पाच ते सहा ग्रॅम सोने असा एकूण ११ लाख ५० हजार रुपये रक्कम आणि काही प्रमाणात सोन्याचा ऐवज लंपास केल्याची घटना मंगळवारी (ता.२७ ऑक्टोबर) पहाटे उघडकीस आली यावरून अज्ञात चोरट्याविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे आईने दुष्काळसदृश परिस्थितीत पुन्हा सशस्त्र दरोडे व चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शहरातील घरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार मंगळवारी पहाटे दोन ते तीन वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी या दोन्ही घरांना लक्ष्य केले घराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश करत चोरट्यांनी घरातील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम चोरून नेली पहाटेच्या सुमारास घडलेल्या या घटनांमुळे परिसरातील रहिवाशांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

### सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरीची घटना कैद

या घरफोडीच्या घटनांमधील महत्त्वाची बाब म्हणजे चोरीची संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे चोरट्यांची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांच्या हालचालींचा माग काढण्यासाठी हे फुटेज महत्त्वाचे ठरू शकते मात्र सीसीटीव्ही फुटेजमध्ये नेमके काय दिसते चोरट्यांची संख्या किती आहे आणि त्यांनी कोणत्या मार्गाने पलायन केले याबाबत अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

### बंद घरे चोरट्यांच्या निशाण्यावर नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज

शहरातील निवासी भागात अशा प्रकारच्या घरफोड्या घडल्याने नागरिकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे विशेषतः घर बंद असताना किंवा पहाटेच्या वेळी चोरटे संधी साधत असल्यास नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज आहे

# विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमांमुळे होणारे विचलन टाळून स्वतःच्या क्षमतांचा विकास करावा

## पोलीस अधिक्षक मुम्माका सुदर्शन यांचे आवाहन । डॉ.पाऊलबुद्धे फार्मसीमध्ये 'प्रारंभ २०२६२७ इंडक्शन कार्यक्रमाचा समारोप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांनी नोकरीबरोबरच व्यवसाय देखील प्राधान्य द्यावे स्पर्धेचे युगात टिकून राहण्यासाठी कठोर परिश्रम ध्येय निश्चिती शिस्त आणि सातत्यपूर्ण अभ्यासाबरोबरच डिजिटल माध्यमांमुळे होणारे विचलन टाळून स्वतःच्या क्षमतांचा विकास विद्यार्थ्यांनी करावा असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्माका सुदर्शन यांनी केले.

वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. एन.जे.पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये बी.व डी.फार्मसी च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'प्रारंभ २०२६२७' या फाउंडेशन व इंडक्शन कार्यक्रमाचा समारोप उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.मुम्माका सुदर्शन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक



श्री.बालाजी वैद्य, भरोसा सेल, निर्भया पथकाच्या उपनिरीक्षक प्रियांका आठरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्रीमती प्रियांका आठरे यांनी महिला सुरक्षा, महिलांविषयी आदर आणि अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी चित्रफितीद्वारे माहिती दिली.फार्मसी अभ्यासक्रमाच्या मूलभूत संकल्पनांची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यासाठी दररोज व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेदरम्यान विद्यार्थ्यांच्या संकल्पनात्मक आकलनाचे मूल्यमापन करण्यासाठी नियमित चाचण्या घेण्यात आल्या. या चाचण्यांमधील कामगिरीच्या आधारे बी.फार्मसी प्रथम वर्षातील भव्य मवाळ, गौतमी ढापसे आणि आदित्य बनबेरू यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. तसेच, डी.फार्मसी अभ्यासक्रमातील शेख ऐरम यांनी प्रथम क्रमांक, तर वाघस्कर प्रज्वल यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमातील व्हाइट कोट सेरेमनी विशेष आकर्षण ठरली.

# स्टेशन रोडवर घरफोडी करणाऱ्या मध्यप्रदेशातील टोळीचा पर्दाफाश

## एलसीबीच्या कारवाईत एक लाखाचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याची उकल करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी मध्यप्रदेशातील दोघा आरोपींसह चोरीचा माल विकत घेणाऱ्या छत्रपती संभाजीनगर येथील दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याकडून १ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ रोजी शिवनेरी चौकातील मातोश्री अपार्टमेंटमध्ये राहणारे विवेक मारोतराव साखरे (वय ६४) यांच्या घरातून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम पळवली होती. याप्रकरणी कोतवाली पोलीस




ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या ■ पान ४ वर

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये 'रुग्ण सुरक्षा व गुणवत्ता सुधारणा' विषयावर सीएनईचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर येथील कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागाच्या वतीने, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई यांच्या सहकार्याने 'रुग्ण सुरक्षा व नर्सिंग व्यवस्थापनातील गुणवत्ता सुधारणा' या विषयावर सातत्यपूर्ण नर्सिंग शिक्षण कार्यक्रमाचे () आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून १० क्रेडिट पॉइंट्स प्रदान करण्यात आले. या उपक्रमाचा एकूण २१२ परिचारिकांनी लाभ घेतला.

रुग्ण सुरक्षा सुनिश्चित करणे, नर्सिंग सेवांमधील गुणवत्ता सुधारणे, रुग्णसेवेतील संभाव्य धोके कमी करणे आणि सुरक्षित व प्रभावी नर्सिंग व्यवस्थापनासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्ये अद्ययावत करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी श्रीमती रिना जॉर्ज, प्राचार्य, सेंट ल्यूक कॉलेज ऑफ नर्सिंग आणि हॉस्पिटल, श्रीरामपूर यांनी महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून निरीक्षक म्हणून काम पाहिले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, ''रुग्णांच्या सुरक्षिततेमध्ये परिचारिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. रुग्णांना सुरक्षित व गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी परिचारिकांनी रुग्ण सुरक्षा प्रोटोकॉल, अद्ययावत मार्गदर्शक तत्त्वे आणि गुणवत्ता सुधारणा प्रक्रियांबाबत आपले ज्ञान सतत अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. रुग्ण सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करूनच सुरक्षित, प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण नर्सिंग सेवा प्रदान करता येते.'' या उपक्रमासाठी संस्थेचे प्रा. डॉ. अभिजित दिवटे सर, संचालक (वैद्यकीय), तसेच डॉ. रामचंद्र पडळकर सर, मुख्य प्रशासकीय अधिकारी यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा चांदेकर, डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल, अहिल्यानगरच्या मेट्रन श्रीमती. जया गायकवाड, तसेच महाविद्यालयाच्या प्राध्यापिका, उपप्राचार्या आणि कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागप्रमुख प्रा. डॉ. योगिता औताडे यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रोत्साहनामुळे या सीएनई कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. डॉ. योगिता औताडे, डॉ. आंम्रपाली संतोष, एन. ए. बी. एच. कोऑर्डिनेटर, प्राध्यापाक श्री. अमोल टेमकर, प्राध्यापक सौ. सलोमी तेलधूने, डॉ . कविता भोकनळ हे व्याख्याते म्हणून लाभले आणि खूप मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामुळे सहभागी नर्सिंग रुग्ण सुरक्षा, गुणवत्ता सुधारणा आणि सुरक्षित नर्सिंग व्यवस्थापनासंदर्भात परिचारिकांना अद्ययावत ज्ञान मिळाले. तसेच रुग्णकेंद्रित, सुरक्षित आणि प्रभावी आरोग्यसेवा प्रदान करण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याची संधी उपलब्ध झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागातील सर्व सहकारी ■ पान ४ वर

# जैन मंदिराचा आदर्श घेऊन विविध संस्था, दानशूरांनी गोशाळांना भरीव आर्थिक मदत करावी– आ. संग्राम जगताप

## कापड बाजार जैन मंदिर ट्रस्टतर्फे विविध ठिकाणच्या गोशाळांना मदतीचा हात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र यावर्षी भीषण दुष्काळाच्या छायेत आहे. पाण्याचा प्रश्न खूप गंभीर बनलेला आहे. पीके नसल्याने शेतकरी हवालदिल झालेला आहे. या परिस्थितीत मुक्या जनावरांच्या चाऱ्याचा, पाण्याचा प्रश्न चिंताजनक आहे. या काळात जैन धर्माचा भूतदयेचा संदेश प्रत्येकाने आचरणात आणला पाहिजे. कापड बाजार जैन मंदिर ट्रस्ट गेल्या अनेक वर्षांपासून अध्यक्ष सुभाषकाका मुथा यांच्या नेतृत्वाखाली गोशाळांना हिरव्या चाऱ्यासाठी भरीव आर्थिक योगदान देत आहे. आताच्या दुष्काळातही जैन मंदिराने पुढाकार घेतला आहे. हा आदर्श समोर ठेवून अन्य सामाजिक संस्थांनीही गोमातेच्या सेवाकार्यात योगदान द्यावे, असे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

कापड बाजार जैन मंदिर ट्रस्टच्या वतीने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणच्या गोशाळांना आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते हिरव्या चाऱ्यासाठी आर्थिक मदतीचे धनादेश देण्यात आले. प्रारंभी प.पू. मुनीराज श्री हितप्रेम विजयजी महाराजा साहेब, प.पू. मुनीराज श्री ज्ञानप्रेम विजयजी महाराजा साहेब यांनी मांगलिक दिली व जीवदयाचे महत्त्व समजून सांगितले.

याप्रसंगी जैन मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुभाष मुथा, ट्रस्टी संघवी सीए राजेशभाई शहा, संघवी लालचंद कासवा, विनोदभाई शहा, डॉ. सागर पटवा, जितेंद्रभाई पोरवाल, राजूभाई बी.शहा, संजयभाई बेदमुथा, महेंद्रभाई मेहेर, जयकुमार पुंगलिया, नगरच्या पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे मॅनेजर राजू पितळे, निंबळक येथील निसर्गसृष्टीचे गौतम कराळे व सुरेंद्र सोनवणे, अरूणोदय गोशाळेचे संजय कटारिया व मनिष फुलडहाळे, व्यापारी मुन्नाशेठ मुनोत आदी उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप पुढे म्हणाले, मुक्या जनावरांना जगवणे हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या संस्कृतीत गायीला तर मातेचे स्थान आहे. गायीच्या पोटात ३३ कोटी देव असतात अशी श्रद्धा आहे. त्यामुळे गायीची सेवा ही ईश्वर सेवाच असते. गोसेवेतून मिळणारे पुण्य आणि आनंद अलौकिक असतो. जैन मंदिर ट्रस्ट अतिशय आत्मियतेने गोसेवेच्या कार्यात सतत योगदान देत आहे. धर्म कार्याला गोसेवेची जोड देऊन नवीन पिढीसमोरही आदर्श ठेवण्याचे कार्य जैन मंदिर ट्रस्ट करत आहे. अशा कार्यातूनच समाजातील युवा पिढी संस्कारित व धार्मिक होईल.

प्रास्ताविक व स्वागत करताना अध्यक्ष सुभाष मुथा म्हणाले, दुष्काळी परिस्थितीचे मोठे संकट सर्वांसमोर आहे. या संकट काळात गरजवंताना कर्तव्य भावनेने मदत केली पाहिजे. त्यातही गोमातेचे संरक्षण व संवर्धन ही सुद्धा आताच्या काळाची गरज आहे. जैन मंदिर ट्रस्ट वेळोवेळी विविध ठिकाणच्या गोशाळांना आर्थिक देणगी देऊन गायीच्या हिरव्या चाऱ्यासाठी मदत करत असते. यावर्षी दुष्काळाचे संकट मोठे आहे. त्यामुळे गोशाळांना जास्तीत जास्त मदतीची गरज आहे. नगरमध्ये आ. संग्राम जगताप मोठे धर्म कार्य करून ■ पान ४ वर

# परिस्थितीवर मात करत उद्योगविश्वात भरारी; दुष्काळात मात्र शेतकऱ्यांच्या मदतीला धावला ढवळपुरीचा सुपुत्र प्रवीण फलके!

## वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवत पुणे-अहिल्यानगरमध्ये उभारला उद्योगसमूह; शेकडो तरुणांना रोजगार, तर दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना किराणा किटचा आधार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**ढवळपुरी** –परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी मनात जिद्द, कष्ट करण्याची तयारी आणि आपल्या माणसांविषयी आपुलकी असेल तर माणूस यशाची शिखरे गाठू शकतो. याचाच प्रत्यय ढवळपुरी (रानमळा) या दुर्गम भागातून पुढे आलेल्या प्रवीण बाळासाहेब फलके या तरुणाच्या प्रवासातून येतो. एका सामान्य कुटुंबातून पुढे येत पुणे आणि अहिल्यानगरमध्ये उद्योगविश्वात स्वतः ची ओळख निर्माण करणाऱ्या या तरुणाने आज मात्र आपल्या यशाचा उपयोग गावातील गरजू शेतकऱ्यांच्या मदतीसाठी करण्याचा आदर्श निर्माण केला आहे.

प्रवीण फलके यांच्या यशामागे त्यांचे वडील बाळासाहेब फलके यांचा संघर्ष आणि त्याग दडलेला आहे. बाळासाहेब यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत कुटुंबाचा गाडा ओढला. कधी बांधकाम मजूर म्हणून, तर कधी गवंडी काम करून त्यांनी संसाराचा डोलारा सांभाळला. स्वतःच्या आयुष्यात कितीही अडचणी आल्या, तरी मुलांच्या शिक्षणात कमतरता पडू दिली नाही. आपल्या मुलांनी शिकून मोठे व्हावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे, हेच त्यांचे स्वप्न होते. त्यासाठी त्यांनी मुलांना पुण्यासारख्या मोठ्या शहरात शिक्षणासाठी पाठवले.

वडिलांच्या घामाचा प्रत्येक थेंब आणि त्यांनी केलेले कष्ट प्रवीण यांच्या मनावर कोरले गेले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रवीण यांनी पुण्यातील एका नामांकित कंपनीत इंजिनिअर म्हणून नोकरी सुरू केली. नोकरी करत असतानाच मनात एक वेगळा विचार आकार घेऊ लागला. केवळ नोकरी करून थांबायचे नाही, तर स्वतःचा व्यवसाय उभा करून वडिलांचे स्वप्न पूर्ण करायचे आणि इतरांनाही रोजगार द्यायचा, असा त्यांनी निर्धार केला. याच जिद्दीतून त्यांनी मॅक्स कापड उद्योग समूहाची एजन्सी घेत पुण्यात दोन शाखा सुरू केल्या. ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर त्यांनी अहिल्यानगरमध्येही दोन शाखा सुरू केल्या. त्याचबरोबर शिवभोज थाळीच्या माध्यमातून रेस्टॉरंट व्यवसायातही पाऊल ठेवले. एका सामान्य कुटुंबातील तरुणाने नियोजन, मेहनत आणि व्यावसायिक दृष्टिकोन यांच्या जोरावर उभा केलेला हा उद्योगप्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या उद्योगसमूहातून आज शेकडो तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

उद्योगात यश मिळाले; पण गावाशी असलेली नाळ तुटली नाही!

शहरात व्यवसायाचा विस्तार होत असला, तरी प्रवीण फलके यांचे मन मात्र नेहमी आपल्या ढवळपुरी गावातच रमलेले असते. गावातील प्रत्येक घडामोडीची ते आवर्जून विचारपूस करतात. कोणत्या शेतकऱ्याच्या शेतात काय परिस्थिती आहे, कोणाच्या घरात अडचण आहे, कोणाला वैद्यकीय मदतीची गरज आहे, याची ते बारकाईने माहिती घेत असतात. पुण्यासारख्या शहरात राहूनही गावातील माणसांशी त्यांचा संपर्क कायम आहे. काही अडचण असेल तर निःसंकोचपणे सांगा, पुण्यात वैद्यकीय किंवा अन्य कोणती मदत लागली तरी मी उभा आहे, असा विश्वास ते गावकऱ्यांना देतात.

दुष्काळात उद्योगपती नव्हे, तर शेतकऱ्यांचा मुलगा मदतीला धावला

यंदा पारनेर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. पाणी, चारा आणि शेतीच्या ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### डॉ.विखे पाटील अभियांत्रिकिचा यश पवारची जपानमध्ये ३ महिन्यांच्या सशुल्क इंटर्नशिपसाठी निवड



अहिल्यानगर- विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाचा विद्यार्थी यश पवार याची जपानमधील एफडीआय, के. के.कंपनी येथे ३ महिन्यांच्या सशुल्क इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. यश हा २०२६ च्या पदवीधर बॅचमधील विद्यार्थी आहे. या इंटर्नशिपमुळे यशला जपानमधील औद्योगिक कार्यपद्धती, आधुनिक तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यावसायिक अनुभव मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या निवडीमुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाविद्यालयातील जपानी भाषा उत्कृष्टता केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जपानी भाषा, जपानी संस्कृती आणि जपानमधील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले जाते. या केंद्राच्या समन्वयक प्रा. पूजा वैकर आणि जपानी भाषा प्रशिक्षक प्रा. वैदेही मुळे-पारनाईक यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकण्याची तसेच जपानमधील रोजगार व प्रशिक्षणाच्या संधींची माहिती मिळत आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांसाठी जागतिक स्तरावरील रोजगाराच्या आणि प्रशिक्षणाच्या संधींची दारे खुली होत आहेत. यश पवार च्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे टेक्निकल डायरेक्टर प्रा. सुनील कल्हापुरे, डायरेक्टर जनरल डॉ. पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील आणि जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयातील जपानी भाषा उत्कृष्टता केंद्राच्या समन्वयक प्रा. पूजा वैकर आणि जपानी भाषा प्रशिक्षक प्रा. वैदेही पारनाईक यांनी यशच्या यशात दिलेल्या मार्गदर्शन व योगदानाबद्दल त्यांचेही कौतुक करण्यात आले.

### डॉ.शेख अरहम फारुक यांचे एम.एस.(ईएनटी) मध्ये यश संपादन



अहिल्यानगर- जिद्द चिकाटी मेहनत आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर अहिल्यानगर शहरातील मेडिकल व्यवसाय करणाऱ्याचा मुलगा शेख अरहम फारूक याने वैद्यकीय क्षेत्रात एम.एस.(ई. एन. टी.) पदवीत्तर परीक्षेत यश संपादन केले. त्याने मिळविलेले प्राविण्य नगर शहरासाठी अभिमानाची बाब आहे. अरहम याने एमबीबीएस चे शिक्षण इंडियन इनस्टिट्युट ऑफ मेडिकल आणि रिसर्च सेन्टर बदनापुर जि. जालना येथून पूर्ण केले. तसेच मास्टर डिग्रीचे एम.एस. शिक्षण नागपूर येथील एन.के.पी. साळवे इन्स्टिट्यूट आणि लता मंगेशकर हॉस्पिटल या वैद्यकीय महाविद्यालयात पूर्ण केले. या कामे त्यांना डॉ. काशीद गजानन नगर यांनी मार्गदर्शन केले. तसेच त्यांचे आई व वडील यांनी त्यांना लहानपणा पासून विशिष्ट ध्येय पुढे ठेवले होते. डॉ.अरहम याने मेहनतीच्या जोरावर यश संपादन केले. परीक्षा पास केल्यामुळे त्यांना अनेकांनी कौतुक व शुभेच्छा दिल्या.

## नृत्यझंकारच्या 'नवरंग नवरात्री'तून व कोजागिरी पौर्णिमेतून,संस्कृती,परंपरा आणि स्त्रीशक्तीचा जागर

**६० बालकलाकारांच्या नृत्याविष्काराने प्रेक्षक मंत्रमुग्ध; 'नाच गं घुमा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद गरबा, गोंधळ, जोगवा आणि श्रीकृष्णाच्या रासलीलेतून साकारले नवरात्रीचे नवरंग**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नृत्यझंकार डान्स अकॅडमीच्या वतीने 'नवरंग नवरात्री' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक धार्मिक संस्कृती, भारतीय लोककला, स्त्रीशक्ती आणि आधुनिक सामाजिक संकल्पना यांचा सुंदर मिलाफ या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. तब्बल ६० बालकलाकारांनी सादर केलेल्या नृत्याविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. देवीची विविध रूपे, कोजागिरी पौर्णिमेचे महत्त्व, श्रीकृष्णाची रासलीला, महाराष्ट्राची पारंपरिक लोककला आणि गुजरातच्या गरब्याचे देखणे सादरीकरण यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सीमा ढवळे, भूषण भंडारी , डॉ. ओंकार कोकाटे, राजकुमार गुरुनानी, पालक प्रतिनिधी स्नेहल जामगावकर आणि नृत्यझंकारच्या संचालिका सौ. प्रिया ओगले-जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

कार्यक्रमात देवीच्या पूजनीय रूपांचे दर्शन घडविणाऱ्या नृत्यांसह कोजागिरी पौर्णिमेचे वैशिष्ट्य आणि श्रीकृष्णाच्या रासलीलेचे सादरीकरण करण्यात आले. महाराष्ट्राच्या पारंपरिक जोगवा आणि गोंधळ या लोककलाही बालकलाकारांनी प्रभावीपणे सादर केल्या. त्यांच्या सादरीकरणातून भक्ती, परंपरा आणि संस्कारांचे दर्शन घडले. जणू आपण देवीच्या मंदिरातच उपस्थित आहोत, असा अनुभव प्रेक्षकांना आला. गुजरातच्या गरबा नृत्याचे आकर्षक आणि देखणे सादरीकरणही या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात महिला घर, कुटुंब आणि कामाच्या जबाबदाऱ्या सांभाळत प्रत्येक आघाडीवर समर्थपणे उभ्या असतात. आधुनिक स्त्रीची ही जिद्द, संघर्ष आणि सामर्थ्य 'नाच गं घुमा' या नृत्याच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आले. या सादरीकरणाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेकांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात बालकलाकारांना दाद दिली.संपूर्ण कार्यक्रमात पारंपरिकता, धार्मिकता आणि संस्कारक्षम विचारांना आधुनिकतेची जोड देण्यात आली. विविध नृत्यप्रकारांतून सामाजिक संकल्पना मांडत प्रेक्षकांना सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

राजकुमार सहदेव आणि नीला गडाख यांनी देवीची स्तुती गाऊन कार्यक्रमात भक्तिमय वातावरण निर्माण केले. नृत्य क्षेत्रात राज्यस्तरीय बक्षिसे मिळविणाऱ्या मुलींचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.यावेळी पाहुण्यांनी आहार, बालमानसशास्त्र आणि नृत्याचा आरोग्याशी असलेला संबंध या विषयांवर मार्गदर्शन केले. नृत्य ही केवळ मनोरंजनाची कला नसून शारीरिक आरोग्य, मानसिक आनंद आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठीही महत्त्वाची असल्याचा संदेश या मार्गदर्शनातून देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वर्षा पाठक रोडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नृत्यझंकार डान्स अकॅडमीच्या संचालिका सौ. प्रिया ओगले-जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत – विकास आढे

**विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा गौरव; वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर यांच्या वतीने संस्थेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांसाठी आयोजित करण्यात आलेला शालेय पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा गौरव करणे, त्यांच्या यशाला प्रोत्साहन देणे आणि भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी योग्य दिशा देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्रवीण देशमुख होते, तर उद्घाटन अहिल्यानगर मंडळाचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांच्या हस्ते झाले. प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, किरण आव्हाड, तांत्रिक कामगार युनियन ५०५९ (महाराष्ट्र राज्य)चे सरचिटणीस प्रभाकर लहाणे, व्यवस्थापक सुदीप साळवे, पाथरकर काका, हवालदार साहेब, बारवकर साहेब, रघुनाथ तात्या लाड, माऊली बडदे आणि भारत साळुंखे यांचा समावेश होता.

यावेळी नाशिक परिमंडळाचे जनसंपर्क अधिकारी तथा प्रसिद्ध व्याख्याते विकास आढे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दहावी आणि बारावीनंतर विद्यार्थ्यांसमोर शिक्षणाच्या तसेच करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असतात. या संधींची योग्य वेळी माहिती घेऊन स्वतःच्या आवडीनिवडी, क्षमता आणि कौशल्ये ओळखणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी केवळ गुण मिळविण्यावर लक्ष केंद्रित न करता भविष्यात कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे, याचे नियोजन शालेय जीवनापासूनच करावे. स्पर्धा परीक्षांची तयारी, तांत्रिक शिक्षण, कौशल्य विकास आणि विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून प्रगतीच्या अनेक वाटा खुल्या होऊ शकतात. त्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे नियोजन, शिस्त आणि आत्मविश्वास या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. अपयश आले तरी खचून न जाता त्यातून शिकण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासावी, असे आवाहन आढे यांनी केले.

## सोशल मीडियावर बनावट खाते हा गंभीर गुन्हा – ढिकले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअॅप, टेलिग्राम सारख्या सोशल मीडियावर बनावट खाते ओळखीच्या तरूण-तरूणींना त्रास देण्याच्या हेतूने उघडण्याचे अनेक प्रकार उघडकीस आले आहे. माहिती-तंत्रज्ञान कायद्यानुसार हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. सोशल मीडियावर खोट्या नावाने खाते उघडू नको, असे आवाहन सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सागर ढिकले यांनी केले.



शहरातील बालिकाश्रम रस्त्यावरील कमल एज्युकेशन संस्थेमधील पोलिस, सैन्य दल, राज्य सेवा सरळ भरती प्रशिक्षण केंद्रामधील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांसाठी आयोजित सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमात पोलिस निरीक्षक ढिकले बोलत होते. संस्थेचे संचालक हर्षद वारे अध्यक्षस्थानी होते. हरियाली संस्थेचे अध्यक्ष अभय ललवानी, संचालक फुलचंद बारस्कर, पोलिस अंमलदार राघवेंद्र भालसिंग, नीलेश पठारे आदी उपस्थित होते.

पोलिस निरीक्षक ढिकले म्हणाले की, प्रेमसंबंध संपुष्टात येणे, दुसऱ्या व्यक्तीशी लग्न जमणे या सारख्या घटना घडलेल्या क्रियेला प्रतिक्रिया म्हणून सोशल मीडियावरील बनावट खात्यातून बदनामी करणे, जुने फोटो व्हायरल करण्यासारखे प्रकार घडले आहे. कोणत्याही व्यक्तीचे बदनामीकारक, चरित्र्यहनन होईल, असे फोटो, व्हिडिओ व्हायरल करणे माहिती-तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ (सी) नुसार गंभीर गुन्हा आहे. या गुन्ह्याखाली दोषी आढळल्यानंतर शिक्षेसह दंडाची तरतूद आहे.

कोणत्याही गुन्ह्यामध्ये शिक्षा झाल्यास शासकीय सेवेसह करिअरचे दरवाजे बंद होतात. ईमेल आणि मोबाईलच्या आयएमई क्रमांकामुळे तत्काळ लागतो. तांत्रिक स्वरूपाचा हा गुन्हा असल्याने बचावाचा पर्याय नाही. त्यामुळे सोशल मीडियावर बनावट खाते उघडू नये.

सायबर गुन्हेगारांना भौगोलिक मर्यादा नाहीत. परदेशात राहून सायबर गुन्हे करत असल्याने त्यांचा शोध घेण्यात अडचणी येत आहेत. शेअर मार्केटच्या आमिषाने सोशल मीडियावरील अनोळखी व्यक्तीमार्फत गुंतवणूक करू नये, अनोळखी व्यक्तीला बँकेची माहिती देऊ नये. एपीके फाईल, क्वीक स्पोर्ट सारखे अॅप डाऊनलोड केल्यास माहितीमधील सर्व डाटा समोरील व्यक्तीला मिळतो.

## आरोग्य भारतीतर्फे नि:स्वार्थ रुग्णसेवा करणाऱ्या डॉक्टरांसह १२ मान्यवरांचा धन्वंतरी पुरस्काराने गौरव

**कै. डॉ. केदारनाथ चांडक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ केडगाव येथे पुरस्कार सोहळा उत्साहात**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहर्निशं सेवामहे! या सेवाभावी भावनेतून आयुष्याच्या अखेरपर्यंत रुग्णसेवेचा ध्यास घेतलेल्या कै. डॉ. केदारनाथ चांडक (सोनई) यांच्या स्मरणार्थ आरोग्य भरती यांनी केडगाव येथील सरस्वती विद्यालयात धन्वंतरी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आरोग्य क्षेत्रात निःस्वार्थ भावनेने सेवा देणाऱ्या चार डॉक्टरांसह योग, सूर्यनमस्कार आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अन्य आठ जणांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

आरोग्य भारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ सुरेश पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून सुहास हिरेमठ उपस्थित होते. पुरस्कारातील डॉ. प्रभाकर पवार, डॉ. श्रीवल्लभ घोरपडे, डॉ. श्रीकृष्ण जोशी, डॉ. विजयकुमार वऱ्हाडे, शांतीलाल चंदे, रमेश माधवस्वामी व अन्य पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. किशोर पुरकर यांनी केले. यावेळी त्यांनी आरोग्य भारतीच्या २४ वर्षांच्या सामाजिक व आरोग्यविषयक कार्याचा लेखाजोखा मांडला. संस्थेने या कालावधीत आरोग्य क्षेत्रात केलेले कार्य, विविध सामाजिक उपक्रम आणि जनजागृतीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवलेले आरोग्यविषयक संदेश यांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरेश पाटणकर म्हणाले की, देशातील आरोग्यविषयक परिस्थितीत सकारात्मक बदल घडवून आणणे ही काळाची गरज आहे. परदेशातील वैद्यकीय उपचारपद्धती अधिक चांगल्या असल्याचा अनेकांचा समज असतो; मात्र भारतातही सक्षम वैद्यकीय सुविधा आणि प्रभावी उपचारपद्धती उपलब्ध आहेत. नागरिकांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. तंबाखू, सिगारेट आणि गुटख्यासारख्या व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे. सध्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असून, हवेच्या प्रदूषणामुळे श्वसनविकारांचाही धोका वाढत आहे. हे धोके कमी करण्यासाठी नियमित व्यायाम, प्राणायाम आणि योगाभ्यासाला दैनंदिन जीवनात महत्त्व दिले पाहिजे. आरोग्यविषयक मार्गदर्शन करत त्यांनी पुरस्कारार्थींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुणे सुहास हिरेमठ यांनी मन प्रसन्न ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. धन्वंतरी ही आरोग्याची देवता मानली जाते. शरीर, बुद्धी आणि मन या तिन्ही स्तरांवर निरोगी राहणे आवश्यक आहे. स्वतःचे आरोग्य जपणे हे प्रत्येकाचे पहिले कर्तव्य आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकजण व्यसनांच्या आहारी जात आहेत.

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडावर ५ हजार दिव्यांचा भव्य दीपोत्सव!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड येथे खानावले, पनवेल येथील मोहन लबडे यांच्या वतीने त्यांचे वडील कै. बाळाराम लबडे यांच्या स्मरणार्थ अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या ११ वर्षांपासून मोहन लबडे महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांवर या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करून वारकरी संप्रदायाची परंपरा जपण्याचे आणि वारकऱ्यांची सेवा करण्याचे कार्य करीत आहेत. यंदा २३ ऑक्टोबरपासून श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडावर धार्मिक उत्सवाला सुरुवात झाली असून, ज्ञानेश्वरी पारायण, भजन, हरिपाठ, कीर्तनसेवा आणि महाप्रसाद अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



या सप्ताहानिमित्त खानावले, पनवेल येथून सुमारे एक हजार वारकरी गडावर दाखल झाले आहेत. पांढराशुभ्र पोशाख आणि डोक्यावर पांढरी टोपी परिधान केलेल्या वारकऱ्यांचे उपस्थित भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि गोरक्षनाथ महाराज यांच्या जयघोषाने संपूर्ण गड परिसर दुमदुमून गेला. कोजागिरी पौर्णिमेनिमित्त पाच हजार दिव्यांचा भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. या दीपोत्सवामुळे श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड उजळून निघाला आणि धार्मिक वातावरण अधिक प्रसन्न झाले.

मोहन लबडे यांनी वडील कै. बाळाराम लबडे यांच्या स्मरणार्थ गेल्या ११ वर्षांपासून महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांवर अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्याची परंपरा सुरू ठेवली आहे. पहिल्या वर्षी पारनेर तालुक्यातील पिंपळनेर येथे या उपक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पैठण, आपेगाव, मुक्ताईनगर, त्र्यंबकेश्वर, सासवड, रेडेश्वर, वृद्धेश्वर, पुणतांबे, पैठण आणि गहिनीनाथ गड अशा विविध तीर्थक्षेत्रांवर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यंदा श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडावर हा धार्मिक सोहळा मोठ्या भक्तिभावाने आणि आध्यात्मिक उत्साहात सुरू आहे.

या सप्ताहात ह.भ.प. ईश्वर महाराज कदम यांची कीर्तनसेवा संपन्न झाली. त्यांनी आपल्या कीर्तनातून संतांचे महत्त्व आणि संतविचारांचे जीवनातील स्थान विशद केले. संत तुकाराम महाराज यांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून समाजाला योग्य दिशा दिली. त्यामुळे प्रत्येकाने संतांचे विचार आपल्या आचरणात आणणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

## नवरात्रोत्सव आणि कोजागिरी पौर्णिमेनिमित्त मिलन ग्रुपतर्फे महाप्रसादाचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नवरात्रोत्सव आणि कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरातील बालिकाश्रम रोड येथे मिलन ग्रुप मित्र मंडळ आणि ओमकार लेंडकर मित्र मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक श्रद्धा, भक्तिभाव आणि सामाजिक एकोपा जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

नवरात्रोत्सव हा शक्तीची उपासना करण्याचा, तर कोजागिरी पौर्णिमा हा भक्तिभाव आणि आनंदाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. या दोन्ही धार्मिक पर्वांचे महत्त्व लक्षात घेऊन मिलन ग्रुप मित्र मंडळ आणि ओमकार लेंडकर मित्र मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात देवीच्या महाआरतीने करण्यात आली. उपस्थितांनी भक्तिभावाने देवीची आरती केली आणि देवीचरणी नतमस्तक होत सर्वांच्या सुख, समृद्धी व कल्याणासाठी प्रार्थना केली. महाआरतीनंतर महाप्रसाद वितरणास प्रारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थित नागरिक आणि भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून समाजातील नागरिकांना एकत्र आणणे, परस्परांमध्ये स्नेहभाव वाढविणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे, हा अशा उपक्रमांचा महत्त्वाचा उद्देश असतो. मिलन ग्रुप मित्र मंडळ आणि ओमकार लेंडकर मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या महाप्रसादाच्या उपक्रमातून धार्मिक परंपरेचे जतन करण्यासोबतच सामाजिक एकोप्याचा संदेश देण्यात आला.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### घातक शस्त्राने दोन पोलिसांना मारहाण सरकारी कामात अडथळा : ६ निर्दोष

अहिल्यानगर- दि. १३/०४/२०१० रोजी राहुरी येथे नगर मनमाड हायवेवर मार्केट यार्ड समोर दुपारी १.०० वा. चे सुमारास ट्रॅफिक जाम झाल्याने राहुरी पोलिस स्टेशनचे कॉन्स्टेबल श्री. चेमटे व पोलिस नाईक श्री. सुरवसे असे ट्रॅफिक सुरळीत करण्यास गेले असता, तेथील वादावादीतून बाचाबाची झाल्याहुन आरोपी क्र. १. योगेश देशमुख, २. सुभाष वराळे, ३. भाऊसाहेब काकडे, ४. दत्तात्रय म्हसे, ५. पांडुरंग वराळे, ६. दिनकर पवार, सर्व रा. राहुरी हे तलवार व टॉमी घेऊन आले व त्यांनी पोलिस कॉन्स्टेबल चेमटे यांना तलवार व टॉमीने मारहाण केली त्यात चेमटे जखमी झाले. तसेच सुरवसे पोलिस नाईक यांनापण मारहाण झाली. श्री. चेमटे हे जखमी झालेने त्यांचेवर प्रथम राहुरी येथे व नंतर नगर येथील सुर्या हॉस्पीटल मध्ये उपचार करण्यात आले. श्री. चेमटे यांच्या फिर्यादीहुन वरील आरोपींच्या विरुध्द राहूरी पोलिसांनी सरकारी कामात अडथळा, आणला व प्राणघातक शस्त्राने गैरकायद्याची मंडळी जमवून मारहाण करणे या कारणाहुन गुन्हा दाखल केला. नगर जिल्हा न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयात दोन्ही पोलिस कर्मचा-यांनी त्याप्रमाणे साक्ष दिली. परंतू प्रभावी उलट तपास व युक्तीवाद व श्री. चेमटे हेड कॉन्स्टेबल हे वाहतूक सुरळीत करतांना ट्रकचे केबीनमध्ये चढतांना तेथून रस्त्यावर पडून जखमी झाले व स्थानिक राजकारणाहुन आरोपींना खोटे या प्रकरणात गुंतवले हा आरोपींचा बचाव न्यायालयाने ग्राहय धरत सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. सर्व आरोपींतर्फे अहमदनगर येथील जेष्ट विधिज्ञ ॲड. सतिशचंद्र सुद्रीक यांनी काम पाहिले.

### केस मागे घेण्यासाठी कोयता-तलवारीचा धाक



अहिल्यानगर - अहिल्यानगर शहरातील बोल्हेगाव येथील भारती रविंद्र जाधव यांनी आपल्याला व आपल्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची तक्रार पोलीस अधीक्षक कार्यालयात दाखल केली आहे. याप्रकरणी संबंधितांवर कायदेशीर कारवाई करून कुटुंबाला संरक्षण देण्याची मागणी त्यांनी अर्जाद्वारे केली आहे. भारती जाधव यांनी अर्जात नमूद केल्यानुसार, २७ ऑगस्ट २०२५ रोजी जालिंदर मुंगसे व सार्थक मुंगसे (दोघे रा. बोल्हेगाव) यांनी त्यांना व त्यांच्या पतीला मारहाण, शिवीगाळ आणि दमदाटी केली होती. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०८१८/२०२६ नोंदविण्यात आल्याचे त्यांनी अर्जात म्हटले आहे. दरम्यान, २२ ऑक्टोबर २०२६ रोजी भारती जाधव यांचे कुटुंब खारे कर्जुने (ता. जि. अहिल्यानगर) येथे गेले असताना, सार्थक मुंगसे हा नंबर प्लेट नसलेल्या काळ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून तेथे आल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे. या कारमध्ये आणखी पाच जण होते. त्यांच्याकडे कोयता, तलवार आणि बॅटसारख्या वस्तू होत्या, असेही अर्जात नमूद आहे. या व्यक्तींनी जाधव कुटुंबाच्या वाहनाचा रस्ता अडवून, आधी दाखल केलेली केस मागे घेण्याची धमकी दिली. केस मागे न घेतल्यास जिवंत सोडणार नाही,

# सभासदांचा विश्वास आणि सहकार्यातून पतसंस्थेची प्रगती – अभय पितळे

**सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेत १५ टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेने सभासदांना १५ टक्के लाभांश वाटपाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षीच्या लाभांश वाटपाचा शुभारंभ चेअरमन अभय पितळे यांच्या हस्ते झाला. पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात हा कार्यक्रम झाला.

याप्रसंगी व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, समीर बोरा, विनित बोरा, शरद गोयल, श्रीकांत भागवत, अमित भांड, तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, सतीश गुंदेचा, सचिन डागा, जनता बचत प्रतिनिधी कांतीलाल गांधी, अभय बोरा, मिलिंद परिहार, प्रफुल्ल छेडा, वैभव मुनोत, कुमार नारंग, किरण बोरा आदी उपस्थित होते.

चेअरमन अभय पितळे म्हणाले, सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा यांच्या आदर्शांवर पतसंस्थेचे कामकाज सुरू आहे. रौप्य महोत्सवी टप्पा ओलांडताना पतसंस्थेने स्थापनेपासून कायम १५ टक्के लाभांश दिला आहे, याचा अभिमान वाटतो. आजमितीस संस्थेकडे १०४ कोटींच्या ठेवी आहेत. संस्था सर्वांत कमी व्याजदराने म्हणजे फक्त ९ टक्के दराने सोनेतारण कर्ज उपलब्ध करुन देते. सभासदांचा विश्वास आणि शिस्तबद्ध कारभारामुळे संस्थेने नेहमीच प्रगती केली आहे. सर्वांना सोबत घेऊन कारभार सुरू असल्याने संस्था यशस्वी घोडदौड करत आहे.

जनता बचत प्रतिनिधी कांतीलाल गांधी म्हणाले, सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा यांनी पतसंस्था स्थापन करताना बचत प्रतिनिधींना खूप प्रोत्साहन व पाठबळ दिले. संस्थेकडून कायम बचत प्रतिनिधींची काळजी घेतली जाते. संस्थेच्या विश्वासार्हतेमुळे बचत प्रतिनिधींना चांगल्या वातावरणात काम केल्याचा आनंद मिळतो. य संस्थेशी जोडलेलो असल्याचा अभिमान वाटतो.

आभार मानताना व्हाईस चेअरमन शैलेश गांधी म्हणाले, ज्या सभासदांचे पतसंस्थेत सेव्हिंग्ज खाते नाही त्यांनी सेव्हिंग्ज खाते उघडून घ्यावे. त्यामुळे खातेदार व सभासदांची केवायसी प्रक्रिया पूर्ण होईल तसेच लाभांशही या खात्यावर जमा होईल. लाभांश बुडण्याची भीती राहणार नाही. संस्थेच्या आर्थिक प्रगतीत बचत प्रतिनिधींचाही मोठा वाटा आहे. सर्व प्रतिनिधी खूप प्रामाणिकपणे आपले काम करत असतात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत भंडारी यांनी केले.

# भाळवणी, निघोज, देसवडेच्या आरोग्य सुविधांसाठी आ. दातेंची मंत्री ना. आबिटकरांना निधीची मागणी

**नवीन इमारतींसाठी प्रशासकीय मान्यतेकरीता आ. दातेंचा शासनदरबारी पुढाकार**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघातील आरोग्य सुविधांना बळकटी देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांनी आज, २७ ऑक्टोबर रोजी मुंबई मंत्रालय येथे राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन भाळवणी व निघोज येथील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि देसवडे येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारतींसाठी प्रशासकीय मान्यता व आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. या तीनही कामांसाठी आमदार दाते सरांनी अधिकृत पत्रव्यवहार करत शासनाचे लक्ष वेधले असून, सबंधित खात्याच्या मंत्र्यांची प्रत्यक्ष मंत्रालयात भेट घेऊन या प्रस्तावांचा पाठपुरावा केला आहे.

भाळवणी आणि निघोज येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या विद्यमान इमारती जुन्या व जीर्ण झाल्यामुळे आरोग्य सेवा पुरविताना अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार काशिनाथ दाते सर यांनी यापूर्वीच ना. प्रकाश आबिटकर यांना पत्र देऊन दोन्ही आरोग्य केंद्रांच्या नवीन इमारतींच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता आणि निधीची मागणी केली होती. तसेच, देसवडे येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी नवीन इमारत उभारण्याच्या प्रस्तावाला मान्यता मिळावी, यासाठी आज स्वतंत्र पत्राद्वारे शासनाकडे मागणी नोंदवली होती. या उपकेंद्राच्या इमारतीसाठी आवश्यक जागाही उपलब्ध असल्याचे त्यांनी सबंधित पत्रात नमूद केलेले आहे.

> **मतदारसंघात ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्य सेवा मिळावी, हा या मागण्यांमागील मुख्य उद्देश आहे. केवळ पत्र देऊन न थांबता संबंधित मंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निधी आणि प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी केली. या तीनही प्रस्तावांना शासनाची मंजुरी मिळाल्यास संबंधित गावांसह परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सबंधित अधिकाऱ्यांना या मागणीचा आराखड्यात समावेश करत पुढील कार्यवाही निर्देश दिले आहे.**
>
> **आ. काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

# अहिल्यानगरच्या वरुण कोल्हेची नेमबाजीत कांस्यपदकाला गवसणी

**राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड!; गोव्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत खेळणार । जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने गौरव**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नागपूर येथे पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय इंटर स्कूल रायफल शूटिंग स्पर्धेत अहिल्यानगरच्या वरुण कोल्हे याने उल्लेखनीय कामगिरी करत कांस्यपदक पटकाविले. १७ वर्षांखालील मुलांच्या ओपन साइड एअर रायफल प्रकारात त्याने हे यश संपादन केले. या कामगिरीच्या जोरावर वरुणची गोवा येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर आणि प्रियदर्शनी भगवती अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर यांच्या वतीने २३ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत शालेय राज्यस्तरीय इंटर स्कूल रायफल शूटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातील विविध विभागांतील शालेय नेमबाजांनी सहभाग नोंदविला. सहभागी खेळाडूंनी आपल्या नेमबाजी कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करत पदकांसाठी चुरशीची लढत दिली.

या स्पर्धेत वरुण कोल्हे याने आपल्या अचूक नेमबाजीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात करत कांस्यपदक मिळविले. राज्यस्तरावर मिळविलेल्या या यशामुळे त्याला राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली आहे. गोवा येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेत तो अहिल्यानगरचे प्रतिनिधित्व करणार असल्याने त्याच्याकडून आगामी स्पर्धेतही चांगल्या कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

वरुणने मिळविलेल्या या यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने त्याचा गौरव करण्यात आला. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते वरुणचा सत्कार करण्यात आला. वरुणला प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्लबच्या सेक्रेटरी सुनीता लिपने यांनी खेळाडूंच्या तयारीसाठी विशेष प्रयत्न केले.

वरुण कोल्हे याने मिळविलेल्या यशाबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे, अपर जिल्हाधिकारी दादासाहेब गीते-पाटील, वरिष्ठ कक्ष अधिकारी लाड साहेब, सोल मॅडम, आमदार संग्राम जगताप, खासदार नीलेश लंके, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, क्रीडा अधिकारी प्रियंका खिंडरे, संतोष वाबळे, कोमल वाकळे तसेच खेळाडूंच्या पालकांनी त्याचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

# ब्रह्मज्ञानाची शिकवण जीवनात उतरवणे म्हणजेच जागृती - निरंकारी सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज

**। आध्यात्मिक जागृतीच्या अखंड प्रवाहात ७९वा निरंकारी संत समागम संपन्न । नगरसह जिल्हातील हजारो श्रद्धाळूंचा परतीचा प्रवास सुरू**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** ''ब्रह्मज्ञानाचे खरे सार्थक ते जीवनात अंगीकारण्यात आणि आपल्या विचारांत, वर्तनात व कर्मांत उतरवण्यात आहे.'' समालखा, हरियाणा येथे आयोजित चार दिवसीय ७९व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या समारोपाच्या दिवशी देश-विदेशातील लाखोंच्या संख्येने उपस्थित श्रद्धाळूंना सतगुरू माता सुदीक्षा जी महाराज यांनी आपल्या पावन आशीर्वचनांतून हा दिव्य संदेश दिला.

सतगुरू माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन सान्निध्यात पार पडलेल्या या संत समागमाने 'जागृती'च्या आध्यात्मिक प्रेरणा जीवनात आत्मसात करून आत्मोन्नतीसोबतच विश्वकल्याणाची भावना दृढ करण्याचे आवाहन केले. सोमवारी सायंकाळी प्रेम, भक्ती आणि श्रद्धेने भारलेल्या वातावरणात समागमाची सांगता झाली. आध्यात्मिक प्रेरणा आणि मधुर आठवणी घेऊन श्रद्धाळू भक्त आपापल्या गंतव्यस्थानी परतू लागले. या दिव्य समागमात नगर शहर व जिल्ह्यातील तसेच ३६अ विभागातील मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या हजारो श्रद्धाळूंचाही परतीचा प्रवास सुरू झाला आहे.

सतगुरू माता जी पुढे म्हणाल्या की,आत्म्याचे परमात्म्याशी मिलन आणि प्रत्येक क्षणी निराकार प्रभूचा अनुभव घेणे, हे आध्यात्मिक जीवनाचे सार आहे. परमात्मा अटल सत्य आहे; मात्र आपल्या इच्छा आणि परिस्थिती सतत बदलत असतात. अनुकूल परिस्थितीत श्रद्धा टिकवणे सोपे असते, पण प्रत्येक परिस्थितीत अढळ राहते तीच खरी भक्ती. ब्रह्मज्ञानातून मिळालेली जागृती आयुष्यभर सजग आणि सचेत राहण्याची प्रेरणा देते. ही जागृती आपल्या वर्तनात, निर्णयांत आणि सामाजिक जीवनातही स्पष्टपणे दिसली पाहिजे असे माताजींनी शेवटी सांगितले.

सतगुरू माताजी यांच्या दिव्य प्रवचनांपूर्वी *निरंकारी राजपिता रमित जी* यांनी जागरूकतेचा संदेश दिला. जीवनात जिथे बदल शक्य आहे, तिथे सकारात्मक प्रयत्न करावेत; आणि जिथे बदल शक्य नाही, तिथे परिस्थिती सहजतेने स्वीकारण्याची क्षमता विकसित करावी तसेच मनुष्य संसारातील गरजा आणि भौतिक सुखसोयींबाबत सजग असतो; मात्र अनेकदा आपल्या आत्म्याची खरी तहान दुर्लक्षित करतो असे सांगितले.

समागमाच्या पहिल्या दिवशी सकाळी सतगुरू माता जी आणि निरंकारी राजपिता जी यांचे फुलांनी सजवलेल्या खुल्या पालखीतून भव्य शोभायात्रेद्वारे समागम मंडपात आगमन झाले. यावेळी निरंकारी इन्स्टिट्यूट ऑफ म्युझिक अँड आर्ट्स ()च्या ६००हून अधिक विद्यार्थ्यांनी भरतनाट्यम आणि मधुर स्वागतगीत सादर करून दिव्य युगुलाचे भावपूर्ण स्वागत केले.

सेवादल रॅली - समागमाच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात भव्य सेवादल रॅलीने झाली. भारतातील विविध राज्यांमधून तसेच परदेशातून सहभागी झालेल्या हजारो सेवादल भगिनी-बंधूंनी उत्साहाने यात भाग घेतला. शारीरिक व्यायाम, लघुनाटिका, खेळ, सांस्कृतिक सादरीकरणे आणि मिशनच्या शिकवणींवर आधारित नाट्यप्रयोगांतून शिस्त, सहकार्य आणि निःस्वार्थ सेवेचा सुंदर संदेश देण्यात आला. रॅलीत उपस्थित भगिनी-बंधू आणि श्रद्धाळूंना सतगुरू माताजींनी मार्गदर्शन केले.

मुख्यमंत्र्यांची उपस्थिती:- समागमाच्या तिसऱ्या दिवशी हरियाणाचे माननीय मुख्यमंत्री श्री नायब सिंह सैनी यांनी समागमस्थळी येऊन सतगुरूंचे पावन आशीर्वाद घेतले. अनेक नगरसेवक आणि आमदारांनीही सतगुरू माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांचे पावन दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केले.

# आधुनिक स्वच्छता मशीनमुळे शहरातील ४० किलोमीटर रस्त्यांची आठ तासांत स्वच्छता!

**आमदार संग्राम जगताप व महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडून प्रात्यक्षिकाची पाहणी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील रस्ते स्वच्छतेसाठी आधुनिक स्वच्छता मशीन गाडीचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. पुणे येथील चॅलेंजर स्वीपर कंपनीच्या माध्यमातून पत्रकार चौक येथे हे प्रात्यक्षिक घेण्यात आले. आमदार संग्राम जगताप व महापौर ज्योतीताई गाडे यांनी प्रात्यक्षिकाची पाहणी करून मशीनच्या कार्यक्षमतेची माहिती घेतली. या मशीनच्या माध्यमातून कमी वेळेत रस्त्यांची स्वच्छता करता येणार असून वेळेची बचत होण्यासोबतच संपूर्ण शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मदत होईल, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहरात विविध क्षेत्रांमध्ये विकासकामे सुरू असून शहराचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आपणही एक पाऊल पुढे टाकणे आवश्यक आहे. महानगरपालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असताना शहराचा विस्तार मात्र वेगाने वाढत आहे. त्यामुळे संपूर्ण शहर स्वच्छ ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्वच्छता यंत्रणा अधिक सक्षम करणे गरजेचे आहे.

चॅलेंजर स्वीपर कंपनीच्या मशीन गाडीच्या माध्यमातून पत्रकार चौक येथे रस्ते स्वच्छतेचे प्रात्यक्षिक करण्यात आले असून त्याची पाहणी केली आहे. मात्र, शहराच्या वाढत्या विस्ताराचा विचार करता यापेक्षाही अधिक सक्षम स्वच्छता मशीनची आवश्यकता आहे. त्यामुळे पुन्हा एकदा प्रात्यक्षिकाची पाहणी करून योग्य मशीनबाबत निर्णय घेतला जाईल. शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे झाली आहेत. विकासकामांसोबत पर्यावरणाच्या दृष्टिकोनातूनही शहरात विविध उपक्रम सुरू आहेत.

माजी उपमहापौर गणेश भोसले, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव हे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी काम करत आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यावर दुष्काळाचे मोठे सावट असल्याने वृक्षारोपणाबरोबरच झाडांचे संवर्धन करण्यासाठी नागरिकांच्या सहभागातून लोकचळवळ उभी करणे गरजेचे आहे, असेही आमदार जगताप यांनी सांगितले.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे झाली आहेत. हे रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी नियमित सफाई करणे आवश्यक आहे. मात्र, महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे संपूर्ण शहर स्वच्छ ठेवताना अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत आधुनिक स्वच्छता मशीनचा वापर केल्यास कमी वेळेत अधिक रस्त्यांची स्वच्छता करणे शक्य होईल.

या मशीनच्या माध्यमातून आठ तासांत सुमारे ४० किलोमीटर रस्त्यांची स्वच्छता करता येते. शहरातील रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी अशा आधुनिक यंत्रणेचा उपयोग होऊ शकतो.



## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय ता. पारनेर, जिल्हा अहिल्यानगर

फोन नं. ०२४८८-२२१५२८ ईमेल आर.डी.tahasildargarner@gmail.com
क्रं. कावि/अभिलेखा/२५/२०२५ पारनेर दि. ५/२/२०२६

### जाहीर प्रगटन प्रसिद्ध करणेबाबत

(जन्म- मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम २०२३)

ज्याअर्थी अर्जदार श्रीमान/श्रीमती सोयब छोटूभाई हवलदार, रा. टाकळीढोकेश्वर, रा. पारनेर, जि. अहिल्यानगर यांचे तहसील कार्यालय, पारनेर येथे त्यांच्या स्वत:च्या जन्म-मृत्यू नोंद घेणेकामी अर्ज सादर केला आहे.
तसेच संबंधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. त्यांची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सोयब छोटूभाई हवालदार | स्वत: | १५-०३-१९९५ |

निबंधकांनी दिलेल्या जन्म/ मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयं स्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात यावे.
तसेच जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमूद अर्जदार यांच्या जन्म/ मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आज दि. ------- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

सही/-
**तहसीलदार तथा**
कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर

# मोदी सरकारकडून अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई

## ‘ऑपरेशन ट्रायडंट’अंतर्गत ३८ ठिकाणी कारवाईची अमित शाह यांची घोषणा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ईशान्य भारतातील घनदाट जंगले, दुर्गम भागांतील कठीण भौगोलिक परिस्थिती आणि देशाच्या अनेक आंतरराष्ट्रीय सीमा यांचा वापर अमली पदार्थांच्या तस्करांकडून दीर्घकाळापासून सुरक्षित आश्रयस्थान म्हणून केला जात आहे. ज्या मार्गांमधून पूर्वी अमली पदार्थांची बिनदिक्कत वाहतूक होत होती, तेच मार्ग आता भारतातील तरुणांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने सरकारच्या रडारवर आले आहेत. ही कारवाई दर्शवते की अमली पदार्थांच्या तस्करीविरोधातील लढा आता केवळ अधूनमधून केल्या जाणाऱ्या छाप्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही. त्याऐवजी, या बेकायदेशीर व्यापाराला आधार देणाऱ्या संपूर्ण नेटवर्कवर प्रहार करण्यासाठी सरकार समन्वित रणनीती अवलंबत आहे.
या रणनीतीच्या केंद्रस्थानी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आहेत.ठाम प्रशासक आणि कुशल राजकीय रणनीतीकार म्हणून त्यांची ओळख सरकारच्या अलीकडील अमली पदार्थविरोधी मोहिमेतून दिसून येते. त्यांच्या निर्देशानुसार, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने (एनसीबी) केंद्रीय आणि राज्यस्तरीय यंत्रणांच्या समन्वयाने २३ ऑक्टोबर २०२६ रोजी आसाम, मिझोराम आणि मणिपूरमधील ३८ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. ‘ऑपरेशन ट्रायडंट’ या सांकेतिक नावाने ही कारवाई करण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या रणनीतिक मार्गदर्शनाखाली ऑपरेशन ट्रायडंट राबविण्यात आले. या मोहिमेत एनसीबीसह ऐझॉल, चंफाई, झोखावथार, चुराचांदपूर आणि कछार यांसारख्या संवेदनशील भागांत कार्यरत असलेल्या विविध यंत्रणांनी समन्वयाने कारवाई केली.

या मोहिमेतून आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करी करणाऱ्या टोळ्यांना, विशेषतः म्यानमारच्या सीमेलगत कार्यरत असलेल्या नेटवर्कना, स्पष्ट संदेश देण्यात आला की त्यांना यापुढे कोणत्याही निर्बंधांशिवाय आपले व्यवहार सुरू ठेवता येणार नाहीत. या कारवाईत १८ जणांना अटक करण्यात आली, ५०० डेटोनेटर आणि १२ लाख रुपये रोख जप्त करण्यात आले. ही केवळ नियमित अंमलबजावणीची कारवाई नव्हती, तर तस्करीचे मार्ग, आर्थिक व्यवहारांचे माध्यम आणि या बेकायदेशीर व्यापाराला मदत करणाऱ्या व्यक्ती अशा संपूर्ण नेटवर्कला उद्ध्वस्त करण्याचा समन्वित प्रयत्न होता. या तपासातून गुन्हेगारी नेटवर्कची आर्थिक व्याप्तीही उघड झाली. शाह यांच्या रणनीतीनुसार राबविण्यात आलेल्या ऑपरेशन ट्रायडंटमध्ये १०० कोटी रुपयांचे हवाला व्यवहार उघडकीस आले. याशिवाय, १,४२४ बँक खाती गोठवण्यात आली आणि १७.८२ कोटी रुपये किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली. म्यानमारमधील सागाईंग प्रदेशातून तस्करांकडून वापरले जाणारे मार्गही बंद करण्यात आले. नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या व्हिजन डॉक्युमेंट (२०२६२०२९) नुसार, समन्वित कारवाई, गुप्तचर माहितीची देवाणघेवाण आणि आर्थिक तपास यांच्या माध्यमातून ही मोहीम पुढे नेली जात आहे.
या कारवाईचे महत्त्व एका मोहिमेपुरते मर्यादित नाही. ३१ डिसेंबर २०२९ पर्यंत अमली पदार्थांच्या तस्करीचे नेटवर्क मुळापासून नष्ट करण्याचा निर्धार शाह यांनी व्यक्त केला आहे. ऑपरेशन ट्रायडंट हे त्या वचनबद्धतेच्या पूर्ततेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. अमली पदार्थमुक्त भारताची त्यांची संकल्पना एका स्पष्ट तत्त्वावर आधारित आहे : शेवटचे तस्करीचे नेटवर्क उद्ध्वस्त होईपर्यंत अमली पदार्थांविरोधातील मोहीम सुरूच राहिली पाहिजे. भारतातील तरुणांचे संरक्षण आणि देशाच्या सीमांची सुरक्षा करण्याच्या या मोहिमेला आता नव्याने गती मिळाली आहे. मोदी सरकारची अमली पदार्थमुक्त भारताची संकल्पना ही केवळ कायद्याची अंमलबजावणी करण्यापुरती मर्यादित असलेली मोहीम नाही. देशातील तरुण पिढीचे संरक्षण करणे आणि समाजाची घडी सुरक्षित ठेवणे हीदेखील त्यामागील महत्त्वाची बांधिलकी आहे. ईशान्य भारतात समन्वयाने करण्यात आलेल्या या कारवायांमधून आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करी करणाऱ्या टोळ्यांना स्पष्ट संदेश देण्यात आला आहे की, अमली पदार्थांच्या व्यापारात सहभागी असणाऱ्यांना भारतात ना आश्रय मिळेल, ना कोणतीही सवलत. ऑपरेशन ट्रायडंट ही या व्यापक राष्ट्रीय संकल्पनेची ठोस अभिव्यक्ती आहे. अमली पदार्थांच्या नेटवर्कचा आर्थिक पाया लक्ष्य करून आणि निर्णायक अंमलबजावणीच्या माध्यमातून त्यांच्या कारवायांमध्ये व्यत्यय आणून, मोदी सरकार आणि अमित शाह अमली पदार्थमुक्त भारताचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने ठोस पावले उचलत आहेत.

# नेवाशात अवैध मावा तयार करणाऱ्या अड्ड्यावर छापा

## एलसीबीच्या कारवाईत सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त, एकजण अटकेत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने नेवासा येथील माळीवस्ती भागात अवैध मावा तयार करणाऱ्या एका अड्ड्यावर छापा टाकून १ लाख २१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एकाला रंगेहाथ पकडण्यात आले आहे.
जावेद फज्जू शेख (वय ३०, रा. माळीवस्ती, नेवासा) असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. दिनांक २६ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नेवासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. यावेळी जावेद शेख हा त्याच्या राहत्या घरी महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला आणि आरोग्यास अपायकारक असा सुगंधी तंबाखू मिश्रित मावा तयार करून विकत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदीप दरवडे, अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, अशोक लिपणे, आजीनाथ पाखरे आणि



रमीझराजा आतार यांच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी घटनास्थळावरून विविध रंगांचा सुगंधी तंबाखू, सुपारी मिश्रित तयार मावा, एक इलेक्ट्रॉनिक वजन काटा आणि मावा तयार करण्याचे लोखंडी मशीन असा एकूण १ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी आरोपी जावेद शेख याच्याविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५ आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास नेवासा पोलीस करत आहेत.

# सण–उत्सवांतून सभासदांमध्ये कौटुंबिक स्नेहाचे ऋणानुबंध निर्माण होतात – अध्यक्ष इंजि. प्रदीप तांदळे

## आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या दांडिया–गरबा नाइटला उत्स्फूर्त प्रतिसाद! ११० सभासदांसह कुटुंबीयांचा सहभाग; ३५० जणांच्या उपस्थितीत रंगला कौटुंबिक सोहळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (ऐसा) यांच्या वतीने सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दांडिया व गरबा नाइट या कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात ११० सभासदांसह त्यांच्या कुटुंबातील सदस्य अशा एकूण ३५० जणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पारंपरिक राजस्थानी पेहराव, आकर्षक सजावट, विविध सेल्फी पॉइंट्स, डीजे संगीत आणि रोषणाईमुळे कार्यक्रमाला रंगत आली. विविध स्पर्धा आणि बक्षिसांच्या माध्यमातून उपस्थितांनी गरबा व दांडियाचा आनंद घेतला.

ऐसा संस्थेचे अध्यक्ष इंजि. प्रदीप तांदळे म्हणाले की, आपल्याला सण–उत्सवांची महान परंपरा लाभली आहे. या परंपरेच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि वारसा जतन केला जातो. हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी ऐसा संस्थेच्या माध्यमातून सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकत्र आणून विविध सण–उत्सव उत्साहात साजरे केले जातात. अशा उपक्रमांमुळे सभासदांमध्ये कौटुंबिक स्नेहाचे ऋणानुबंध निर्माण होतात. आगामी काळातही संस्थेच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

गरबा आणि दांडिया नाइटनिमित्त विविध स्पर्धांचे



आयोजन करून आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आली होती. उपस्थितांनी या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विजेत्यांना उपस्थित अतिथी आणि कमिटी प्रमुखांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

बेस्ट सोलो डान्सर पुरुष गटात अमोल येनगंदुल, तर महिला गटात कोमल कुलकर्णी यांनी बाजी मारली. बेस्ट ड्रेसअप महिला गटात शिवानी पादीर, तर पुरुष गटात संम्कित गांधी विजेते ठरले. मुलांच्या गटात नमिषा लुनिया विजयी ठरली. लहान मुलांच्या बेस्ट डान्स स्पर्धेत हीर सचदेव हिने प्रथम, आरोही येनगंदुल हिने द्वितीय, तर आर्या तांदळे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. बेस्ट कपलचा पुरस्कार रोहित आणि प्रीती लुनिया यांना, तर बेस्ट ग्रुपचे पारितोषिक राधा आणि कृष्णा ग्रुपला देण्यात आले. दीप्ती सबलोक आणि डिंपल परदेशी यांनी स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून काम पाहिले.

या कार्यक्रमाच्या आयोजनाची मुख्य जबाबदारी सांस्कृतिक समितीचे प्रमुख अजय दगडे आणि महिला विंग प्रमुख वैशाखी हिरे यांनी सांभाळली. सभासद व त्यांचे कुटुंबीय खास राजस्थानी पद्धतीचा पारंपरिक पेहराव करून उपस्थित राहिले होते. आकर्षक सेल्फी पॉइंट्स, डीजे संगीत आणि भव्य रोषणाईमुळे कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण झाले.कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक एस.आर.जे. स्टीलचे अविनाश पुरोहित, विशाल येसेकर, टोस्टेम विंडोचे शुभम बनसोडे, शनीराज टाइल्सचे शिवाजी शिंदे आणि व्यंकटेश इन्फ्राचे ओम आठरे होते. तसेच अंबिका स्टोन क्रशर, श्री आनंद ट्रेडिंग कंपनी, श्री आनंद सेल्स, पटेल सिरॅमिक, वैष्णवी टाइल्स, डायकीन एसी, श्रीराम मार्बल, अर्टिको लिफ्ट, पंकज स्टील, ढोणे ट्रेडर्स, अभय सेल्स कॉर्पोरेशन, शुभारंभ टाइल्स, संकल्प इंटरप्रायजेस आणि डायमंड टाइल्स या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

विशाल येसेकर यांनी एस.आर.जे. स्टील संस्थेच्या माध्यमातून विविध तांत्रिक उपक्रमांशी जोडले जात असताना वर्षभर तांत्रिक, कौटुंबिक आणि सामाजिक उपक्रम एकत्रितपणे आयोजित करण्यास प्रोत्साहन दिले जात असल्याचे सांगितले. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष सुनील औटी, संतोष खांडेकर, अनमोल जैन, सुनील जाधव, सचिन डागा, संकेत पादिर, गौरव मांडगे, अमोल येनगंदुल, आदिनाथ आंबेकर, सागर ढगे, अमेय कुलकर्णी, विजय उजनीमठ यांच्यासह संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल व रोटरी क्लब ऑफ मुलुंड हिल्सची संयुक्त सभा खेळीमेळीच्या वातावरणात

## दोन्ही अध्यक्षांनी क्लब फ्लॅगचे एक्सचेंज केले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ मधील रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल व डिस्ट्रिक्ट ३१४१ मधील रोटरी क्लब ऑफ मुलुंड हिल्स, मुंबई यांची जॉईट क्लब मीटिंग हॉटेल सयाजी (), सावेडी रोड अहिल्यानगर येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाली.

मंचावर अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष रो. अमर गुरप, सेक्रेटरी रो. सुनील मुथा, रो. डॉ. कुणाल कोल्हे तसेच मुलुंड हिल्सचे अध्यक्ष रो. विनोद चौबे, सेक्रेटरी रो. के. व्ही. नटराजन व रो. डॉ. नारायण शर्मा उपस्थित होते.

सभेची सुरुवात अध्यक्ष रो. अमर गुरप यांच्या मीटिंग कॉल टू ऑर्डरने व राष्ट्रगीताने झाली. रो. चंद्रकांत सुरी यांनी शेरो–शायरीतून मुलुंड हिल्सच्या अकरा रोटेरियन्सचा परिचय करून दिला व सर्वांचा ट्रॉफी व बुके देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्ष रो. अमर गुरप यांनी प्रास्ताविकात क्लबची व प्रकल्पांची माहिती दिली. अशी इंटर डिस्ट्रिक्ट दोन क्लबची जॉईट मीटिंग व जॉईट प्रोजेक्ट करणारा अहिल्यानगर सिटी मधील क्लबपैकी एकमेव क्लब आमचा आहे, असे प्रतिपादन क्लबचे अध्यक्ष रो. अमर गुरप यांनी यावेळी



व्यक्त केले. तसेच भविष्यातील जॉईट प्रकल्पांची व दोन्ही क्लबचे संबंध अधिक दृढ करण्याची ग्वाही दिली.

ग्लोबल ग्रँट व टी आर एफ डायरेक्टर रो. हरिष नय्यर, मुलुंड हिल्सचे रो. डॉ. नारायण शर्मा व डॉ. अनुप गुप्ता यांनी प्रेझेंटेशन दिले. ह्युमन रिसोर्सेस डायरेक्टर रो. राजीव गुजर यांनी गेल्या पाच वर्षांतील जॉईट प्रोजेक्टची माहिती दिली, ज्यात पडगा, मुंबई येथील दोन शाळा व स्नेहालय, अहिल्यानगर येथील प्रकल्पांचा विशेष उल्लेख होता.

या प्रसंगी दोन्ही क्लबच्या अध्यक्षांनी आपल्या क्लबच्या फ्लॅगचे एक्सचेंज केले.

यावेळी पत्रकार आबिद खान, स्नेहालयाचे व्हॉलेंटिअर्स व फोटोग्राफर यांचाही सत्कार करण्यात आला. मीटिंगनंतर उत्तम फेलोशिपचे आयोजन करण्यात आले व संपूर्ण मीटिंग खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

या मीटिंगला मुलुंड हिल्सचे रो. विनोद चौबे, के. व्ही. नटराजन, डॉ. नारायण शर्मा, अजय पारीख, सी.ए. सतीश सोनी, चंद्रकांत सुरी, डॉ. अनुप कुमार गुप्ता, डॉ. प्रकाश ठक्कर, कैलाश सटनेकर, राजेंद्र शहा, रजनीकांत पारीख उपस्थित होते. तसेच अहिल्यानगर सेंट्रल क्लबचे अध्यक्ष रो. अमर गुरप, पी डी जी रो. शिरीष रायते, क्लबचे चार्टर रोटेरियन डॉ. श्रीकृष्ण जोशी, रो. राजीव गुजर, रो. विजय जुन्द्रे, रो. प्रसन्न खाजगीवाले, रो. हरिष नय्यर, रो. डॉ. कुणाल कोल्हे, रो. डॉ. दिलीप बागल, रो. सुनील कटारिया, रो. मनीष बोरा, रो. निलेश शहा, रो. विनोद बोरा, रो. हितेश गुप्ता, रो. गणेश शहा, रो. उमेश रेखे, रो. सुनील मुथा, रो. संजय मुनोत, रो. ईश्वर बोरा, रो. अजय गांधी, रो. संजय पिपाडा, रो. चेतन अमरापूरकर, रो. आदित्य गांधी, रो. केतन मुथा, रो. दत्ता दीक्षित, रो. अलनूर चार्निया, रो. प्रभाकर बोगा, रो. निलेश मेहेर, रो. मोनेश मेंघानी, रो. गिरीश मुळे, रो. अतुल बोरा, रो. अमृत कटारिया, रो. सतीश कटारिया, रो. डॉ. राहुल पंडित, रो. मनोज बाफना, रो. ईश्वर कटारिया आदी उपस्थित होते. आभार सेक्रेटरी रो. सुनील मुथा यांनी मानले.

(पान १ वरून)

## विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमांमुळे होणारे विचलन टाळून स्वत:च्या क्षमतांचा विकास करावा

या समारंभातून विद्यार्थ्यांना औषधनिर्माणशास्त्र क्षेत्रातील व्यावसायिक जबाबदारी, नैतिक मूल्ये आणि रुग्णसेवेप्रती बांधिलकी यांची जाणीव करून देण्यात आली. यावेळी संस्थेचे संस्थापक स्व. डॉ.नाथ पाऊलबुद्धे यांच्या शैक्षणिक कार्याचा आणि दूरदृष्टीचा चित्रफितीद्वारे परिचय करून देण्यात आला. कार्यक्रमाला सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. रामभाऊ बुचकुल, सचिव श्री. रामकिसन देशमुख, खजिनदार श्री.दादासाहेब भोईटे, बी. फार्मसी प्राचार्य डॉ.श्याम पंगा उपस्थित होते. ‘प्रारंभ २०२६२७’ या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, क्षमता, शिस्तपूर्ण वर्तन आणि चारित्र्य या मूल्यांची जोपासना करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये ‘रुग्ण सुरक्षा व गुणवत्ता सुधारणा’ विषयावर सीएनईचे आयोजन

श्री .राहुल कडू, श्री. अमोल अनाप , श्री गणेश घोलप , श्री. विशाल पुलाटे , श्री दिनेश मगर, श्री. प्रशांत अम्ब्रीत ,सौ. संपदा म्हस्के आणि स्नेहल घोडेराव यांनी विशेष सहकार्य केले. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई यांच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमातून नर्सिंग व्यावसायिकांच्या ज्ञानवृद्धीला आणि गुणवत्तापूर्ण रुग्णसेवेला प्रोत्साहन मिळाले

## स्टेशन रोडवर घरफोडी करणाऱ्या मध्यप्रदेशातील टोळीचा पर्दाफाश

मार्गदर्शनाखालील पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. हा गुन्हा मध्यप्रदेशातील कपिल चंपालाल चावडा याने केल्याची व तो नेवासा फाटा येथे येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून कपिल पावडा (वय २३, रा. खरगोण, मध्यप्रदेश) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपला साथीदार राजा चेयनसिंग पटेल (वय २३) याच्या मदतीने चोरी केल्याची व काही दागिने छत्रपती संभाजीनगर येथे विकल्याची कबुली दिली.
यानंतर पोलिसांनी राजा पटेलला ताब्यात घेऊन त्याच्याकडून ५ ग्रॅम सोन्याची अंगठी, ५० ग्रॅमचे चांदीचे बिस्कीट, एक मोबाईल, लोखंडी पान्हा आणि एक बॅग असा एकूण १ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच चोरीचा माल विकत घेणारे छत्रपती संभाजीनगरचे रहिवासी अनिल रामनारायण तिवारी (वय ५६) आणि भारत नानासाहेब जोशी (वय ३२) यांनाही अटक केली आहे. सर्व आरोपींना कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## परिस्थितीवर मात करत उद्योगविश्वात भरारी; दुष्काळात मात्र शेतकऱ्यांच्या मदतीला धावला ढवळपुरीचा सुपुत्र प्रवीण फलके!

खर्चाचा प्रश्न गंभीर बनला आहे. अशा संकटाच्या काळात प्रवीण फलके यांनी केवळ परिस्थिती पाहून हळहळ व्यक्त केली नाही, तर प्रत्यक्ष मदतीचा हात पुढे केला. दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या गरजू शेतकरी कुटुंबांना महिनाभर पुरेल अशा किराणा सामानाच्या किट देण्याचा त्यांनी निर्णय घेतला. गरजू कुटुंबांपर्यंत ही मदत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले. विशेष म्हणजे, ही मदत केवळ एक सामाजिक उपक्रम म्हणून न करता त्यामागे एक भावनिक विचार आहे. माझ्या गावातील कोणत्याही शेतकऱ्याच्या घरात दुष्काळामुळे चूल पेटण्याची अडचण निर्माण होऊ नये, माझ्या गावातील मुलाबाळांची दिवाळी हिरमुसलेली जाऊ नये, प्रत्येक कुटुंबाने आनंदाने सण साजरा करावा, हीच त्यांची मनापासून इच्छा आहे.
एका कष्टकरी बापाचा मुलगा आज शेतकऱ्यांच्या पाठीशी!
ज्या वडिलांनी आयुष्यभर बांधकामावर घाम गाळून मुलांना शिकवले, त्याच वडिलांचा मुलगा आज स्वतःच्या कष्टातून उभा राहून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीला धावत आहे, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. प्रवीण यांचे लहान बंधूही चारचाकी वाहनांच्या गॅरेज व्यवसायात अहिल्यानगरमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत. दोन्ही भावांनी वडिलांच्या कष्टाचे चीज करत उद्योगाच्या माध्यमातून अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. ढवळपुरी हे बारा वाड्या आणि तेरावी ढवळपुरी अशा विस्तीर्ण परिसरात विस्तारलेले मोठे गाव. या गावातील रानमळ्यासारख्या भागातून बाहेर पडून शहरात स्वतःचे स्थान निर्माण करणे आणि पुन्हा आपल्या गावातील माणसांसाठी धावून येणे, हीच प्रवीण फलके यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख आहे.
आजच्या काळात अनेकजण यश मिळाल्यानंतर आपल्या मातीपासून दूर जातात; मात्र प्रवीण फलके यांनी यशाच्या शिखरावर पोहोचतानाही गावाशी असलेली नाळ जपली आहे. स्वतःच्या प्रगतीसोबत गावातील शेतकरी, तरुण आणि गरजू कुटुंबांचाही विचार करणारा हा तरुण खऱ्या अर्थाने समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.
कारण मोठेपणा हा केवळ किती मोठा व्यवसाय उभा केला यात नसतो, तर आपल्या यशाच्या काळात आपण अडचणीत असलेल्या किती माणसांच्या पाठीशी उभे राहिलो, यात असतो. प्रवीण फलके यांचा प्रवास हेच सांगतो...!

## जैन मंदिराचा आदर्श घेऊन विविध संस्था, दानशूरांनी गोशाळांना भरीव आर्थिक मदत करावी– आ. संग्राम जगताप

जागृती घडवत आहेत. त्यांनी गोमातेच्या संरक्षणासाठी कायम पुढाकार घेत मोठे कार्य चालवले आहे. त्यांच्या आवाहनानुसार समाजातील दानशूर व्यक्ती, विविध सामाजिक संस्थांनी गोशाळांना जास्तीत जास्त आर्थिक मदत करून गोसेवा करावी. तसेच शासनाने जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करून गोधन वाचवावे असे आवाहन सुभाष मुथा यांनी केले.

जैन मंदिर ट्रस्टच्या वतीने निंबळक, नगर पांजरापोळ, अरूणोदय गोशाळा, संगमनेर,मिरी, आश्वी, बार्शी, श्रीगोंदा, सांगोला (पंढरपूर), , करमाळा, वर्धा, भंडारा, पाबळ, यादगीर (कर्नाटक) येथील गोशाळांना आर्थिक मदत करण्यात आली आहे.